साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशू प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

## परळी-परभणी रेल्वे मार्गाचे होणार दुहेरीकरण

परळी वैजनाथ (बातमीदार):- स्वातंत्र्यपूर्व काळापासून धावणाऱ्या परळी-परभणी रेल्वे मार्गाचे आता दुहेरीकरण करण्यात येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत नुकतीच ही माहिती दिली.

शिवसेनेचे (उबाठा) खा.संजय देशमुख यांनी विचारलेल्या लेखी प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती श्री वैष्णव यांनी लोकसभेत दिली. महाराष्ट्रातील मनमाड-इंदौर, जालना-जळगाव, औरंगाबाद-अंकाई, जळगाव-मनमाड, भुसावळ-खांडवा अशा विविध रेल्वे मार्गाच्या कामास मंजुरी देण्यात आली आहे. मनमाड-इंदौर हा नवीन तीनशे नऊ किलोमीटरचा मार्ग असून त्यासाठी



१६ हजार ३२१ कोटी रुपये खर्च होणार आहेत. जालना-जळगाव हा नवीन रेल्वे मार्ग बांधण्यात येणार आहे. १७४ किलोमीटरचा हा मार्ग असून यासाठी ५ हजार ८०४ कोटी रुपये खर्च होणार आहे. छत्रपती संभाजीनगर-अंकाई या मार्गाचे दुहेरीकरण करण्यात येणार असून ९८ किलोमीटर लांबीच्या या मार्गावर ९६१ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. भुसावळ-खांडवा हा तिसरा व चौथा मार्ग असून १३१ किलोमीटर लांबीच्या या मार्गासाठी ३ हजार २४५ कोटी रूपये खर्च करण्यात येणार आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून धावणाऱ्या परळी-परभणी या जुन्या रेल्वे मार्गाचे काही महिन्यांपूर्वी विद्युतीकरण करण्यात आले आहे. आता ६५ किलोमीटर असलेल्या या मार्गाचे दुहेरीकरण करण्यात येणार असून त्यासाठी ७७० कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या सर्व मार्गाच्या कामाला रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. अशी माहितीही श्री वैष्णव यांनी लोकसभेत दिली. महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित सर्व प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. देशातील एक हजार ३३७ रेल्वे स्थानके केंद्र सरकारच्या 'अमृत भारत' स्थानकांमध्ये रूपांतरीत केली जात आहेत. त्यापैकी १३२ स्थानके महाराष्ट्रात आहेत. १३२ पैकी १०७ स्थानकांच्या कामासाठी निविदाही जारी करण्यात आल्या आहेत, अशी माहिती श्री वैष्णव यांनी दिली.

महाराष्ट्रात ५ हजार ८७७ किलोमीटर लांबीच्या ४१ रेल्वे प्रकल्पावर ८१ हजार ५८० कोटी रुपये खर्च केले जात आहेत. वर्धा-यवतमाळ-नांदेड या नवीन रेल्वे मार्गाला मंजूरी देण्यात आली आहे. अशी माहितीही श्री वैष्णव यांनी दिली. ***

## मिशन लक्ष्यवेध खाजगी अकादमींचे सक्षमीकरण आर्थिक सहाय्यासाठी प्रस्ताव सादर करणे बाबत

बीड (जिमाका):- महाराष्ट्र राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील आहे राज्यातील खेळाडूंनी आलिम्पिक सारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्याकरिता नियोजनबद्ध प्रयत्न होणे गरजेचे आहे राज्यातील खेळाडूंसाठी अद्यावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरिता करीअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासाठी देशी / विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने मिशन लक्ष्यवेध या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी राज्यमध्ये करण्याच्या निर्णय घेतलेला आहे मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडण्यात आलेल्या ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी आणि लॉन टेनिस, रोइंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, कुस्ती या १२ क्रीडा प्रकारांच्या राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करणा-या खाजगी अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अशा संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे.

मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खाजगी आकदमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबंधित अकादमी मधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभुत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरींचे गुणांकन करण्यात येऊन, ३५ ते ५० गुण प्राप्त करणा-या संस्था क वर्ग, ५१ ते ७५ गुण प्राप्त करणा-या संस्था ब वर्ग व ७६ ते १०० गुण प्राप्त करणा-या संस्था अ वर्ग अश्या प्रकारे वर्गीकरण करण्यात येणार आहे. क वर्ग अकादमींना वार्षिक रू १०.०० लक्ष, ब वर्ग अकादमींना वार्षिक रू २०.०० लक्ष व अ वर्ग अकादमींना वार्षिक रूपये ३०.०० लक्ष आर्थिक सहाय्य , पायाभूत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे. त्यानुसार इच्छुक संस्थांनी अधिक माहिती व अर्जाचे नमुन्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे संपर्क साधवा व सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन सुधीर मोरे, सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड अरविंद विद्यागर यांनी केलेले आहे. ***

## परळीच्या नवीन प्राथमिक शाळेच्या गौरव गादेकर ने क्रिकेट स्पर्धेत बारामतीत रोवला झेंडा; संघाला मिळऊन दिले विजेतेपद



### मॅन ऑफ द मॅच पुरस्काराने 'गौरव'चा गौरव

**परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळीच्या ऊर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नवीन प्राथमिक शाळेतील सातवीत शिकणाऱ्या गौरव प्रमोद गादेकर या बाल क्रिकेटपटूने बारामतीच्या क्रिकेट मैदानावर दमदार खेळ खेळत आपल्या संघाला 'विजयश्री' मिळवून देत सामन्यातील मॅन ऑफ द मॅच पुरस्कार पटवकावला आहे.**



बारामती येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर क्रीडांगणावर शिवछत्रपती क्रिकेट अकॅडमी विद्यमाने नुकत्याच आयोजित केलेल्या चौदा वर्षांखालील शाळकरी मुलांच्या 'छत्रपती चषक' क्रिकेट स्पर्धेत गौरव गादेकर हा बार्शी येथील एच.पी.सी.सी. या संघाचे कर्णधार म्हणून नेतृत्व करत अंतिम सामन्या पर्यंत संघाला त्याने स्थान मिळवून दिले. अंतिम सामना एस.जे.क्रिकेट अकॅडमी मुंबई विरुद्ध झाला. या सामन्यात एच.पी.सी.सी.संघ विजेता ठरला. या खेळात मुंबई संघाने फलंदाजी करत १२५ धावांचे आव्हान एच.पी.सी.सी.संघापुढे ठेवले होते. १४ ओव्हरमध्येच सामना झाला. या सामन्यात गौरवने कर्णधार पदाला साजेसा खेळ करत चार ओव्हरमध्ये १२ रण घेवून २ विकेट घेतल्या. फलंदाजी करत असताना ३२ चेंडूत ११ चौकार मारत धावांचे अर्धशतक करत आपल्या संघाला एकहाती विजय मिळवून दिला. तो ५० धावा काढून नाबाद राहिला. या सामान्यात मॅन ऑफ द मॅच चा पुरस्कार त्याने पटकावला. हे सामने लेदर बॉलवर खेळले गेले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्या संघास प्रथम पारितोषिक व कर्णधार गौरव यास मॅन ऑफ द मॅच चा पुरस्कार देवून गौरविण्यात आले. परळीतील विद्यार्थ्याने बारामती जावून विजयाचा झेंडा रोवल्याल्याबद्दल व संघास विजेतेपद मिळवून दिल्याबद्दल गौरव गादेकर या विद्यार्थ्याचे येथे कौतुक होत आहे. दरम्यान, त्याच्या या यशाबद्दल नवीन प्राथमिक शाळेच्या शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके, सर्व संचालक, तसेच मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, पर्यवेक्षक उमेश देशमुख, एल.आय.वाकडे, क्रीडा विभाग प्रमुख विनोद वाघमारे यांच्यासह इतर शिक्षकवृंदांनी गौरवचे अभिनंदन केले आहे. लहानपणापासुन क्रिकेटची आवड असल्याने गौरवने विविध क्रिकेट स्पर्धेत सहभागी होत दमदार कामगिरी करत आपल्या खेळाची चुणूक दाखवलेली आहे. अनेक पारितोषिके पटकावली आहेत. क्रिकेटच्या खेळाबरोबरच गौरव अभ्यासातही आघाडीवर आहे. विविध शालेय स्पर्धा परीक्षेत, शिष्यवृत्ती परीक्षेत त्याने घवघवीत यश मिळवले आहे. खेळ आणि अभ्यास या दोन्हीही गोष्टीला सारखेच महत्व देत गौरवची वाटचाल सुरू आहे. ***

# पत्रकार धनंजय आरबुने यांना पुरस्कार प्रदान



सिंदखेड राजा (बातमीदार):- सिंदखेड राजा हे परगणा लखोजीराव जाधव यांच्या राजवाड्यासाठी प्रसिद्ध आहे. हा राजवाडा सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात जिजाबाईंचे वडील लखुजी जाधव यांनी बांधला होता . जिजाबाईंचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी याच ठिकाणी झाला.

ख्यातनाम बहुजन साहित्य संघ, चिखलीच्या वतीने मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील राजे लखुजी जाधव साहित्य नगरी, येथे संपन्न झालेल्या साहित्य संमेलनात परळी येथील ज्येष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या वास्तववादी व सामाजिक लिखाणा बद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थळावर प्रांत तथा जिल्ह्यातून आवर्जून उपस्थित झालेल्या साहित्यिक, कवी,आणि लेखक व रसिक माता भगिनींना सर्व मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. या साहित्य संमेलनात आपल्या वैविध्यपूर्ण लेखनाने वास्तववादी विषय मांडून सामाजिक जागृती करणारे परळी येथील जेष्ठ पत्रकार धनंजय आरबुने यांना त्यांच्या लिखाणाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला. या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून विविध साहित्यिक, लेखक, पत्रकार यांनी त्यांना फोन करून तसेच प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा दिल्या आहेत. ***

# न्यू हायस्कूलच्या समर्थ चौरे याची राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेसाठी निवड



परळी वैजनाथ (बातमीदार):- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय मीन्स कम मेरिट शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) २०२४-२५ मध्ये न्यू हायस्कूल थर्मल परळी वैजनाथ , येथील विद्यार्थी चि.समर्थ रामदास चौरे याची निवड झाली आहे. त्याने परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून हे यश संपादन केले आहे.

ही परीक्षा २२ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आली होती. या परीक्षेत समर्थ चौरे याने मानसिक क्षमता चाचणी (MAT) आणि शालेय विषय चाचणी (SAT) या विभागांत उत्कृष्ट गुण मिळवून त्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या उज्वल यशाबद्दल शालेय समितीचे अध्यक्ष माननीय श्री नानासाहेब सोळंके, तसेच इतर सर्व सदस्यांनी व शाळेच्या मुख्याध्यापक श्री देशमुख एस पी, पर्यवेक्षक राठोड बी एस तसेच शिक्षकवर्गाने त्याचे अभिनंदन केले. शाळेच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद आणि पालकांनी उपस्थित राहून त्याला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. न्यू हायस्कूल थर्मल परळी च्या गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे आणि शिक्षकांच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांना असे यश मिळत आहे. समर्थ चौरे याने मिळवलेले हे यश संपूर्ण शाळेसाठी गौरवाचे आहे. ***

# राजस्थान मधील जयपूर येथे २६ आणि २७ ला पत्रकारांच्या राष्ट्रीय अधिवेशनाचे आयोजन

जयपूर (बातमीदार):- असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेचे ३१ वे राष्ट्रीय अधिवेशन दिनांक २६ व २७ एप्रिल २०२५ रोजी राजस्थान राज्यातील जयपूर येथे आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संघटनेचे राजस्थान राज्य अध्यक्ष गोपाल गुप्ता यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती सांगताना संघटनेचे राज्य अध्यक्ष गोपाल गुप्ता यांनी म्हटले आहे की या अधिवेशनामध्ये भारत देशातील विविध राज्यातून जवळपास ३५० प्रतिनिधी सहभागी होण्याची शक्यता आहे.

या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे ज्यावेळी या संघटनेची स्थापना १९८६ साली झाली त्यावेळी पहिले अधिवेशन राजस्थान मधील जयपूर येथे संपन्न झाले होते आणि त्यावेळी राज्यपाल म्हणून महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले वसंत दादा पाटील हे होते. त्यावेळी संघटनेच्या संपन्न झालेल्या अधिवेशना मध्ये तत्कालीन राजस्थानचे राज्यपाल कै. वसंत दादा पाटील हे प्रमुख पाहुणे होते. तर आताचा योगायोग असा की आज हेच अधिवेशन राजस्थान मधील जयपूर येथे संपन्न होत आहे तर आज राजस्थानचे राज्यपाल म्हणून महाराष्ट्राचे हरिभाऊ नाना बागडे हे काम पाहत आहेत. आणि या अधिवेशनात ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय अधिवेशनाच्या निमित्ताने एक सुंदर अशी स्मरणिका प्रसिद्ध करण्यात येणार असून या स्मरणिकेचे नाव ''कलम कुंभ'' असे देण्यात आले आहे या स्मरणिकेमध्ये विविध राज्यांच्या पत्रकारितेचा इतिहास संकलित करण्यात आलेला आहे. स्मरणिकेच्या मुखपृष्ठावर राज्यातील प्रमुख दुर्गा सहित जयपूरचे आराध्य दैवत असलेले गोविंद देव यांचे सुंदर असे चित्र प्रकाशित करण्यात आले आहे याचबरोबर आग्रपुज्य मोती डोंगरी गणेशजी यांचे चित्र प्रकाशित करण्यात आले आहे.

देशभरातील अनेक राज्यातील पत्रकारितेचा इतिहास या स्मरणिकेचे वैशिष्ट्य असणार आहे. ही स्मरणिका सुंदर करण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. अधिवेशनाच्या उद्घाटन सत्राच्या नंतर दोन सत्रांमध्ये हे अधिवेशन संपन्न होणार असून या अधिवेशनामध्ये छोट्या आणि मध्यम वृत्तपत्राच्या विविध समस्या अडीअडचणी आणि संघटनेच्या बांधणीवर विशेषत्वाने चर्चा करण्यात येणार आहे. त्याचबरोबर ज्या संपादकांना पत्रकारितेमध्ये पन्नास वर्षाहून अधिक काळ ते पत्रकारिता करत आहेत अशा पत्रकारांचा गौरव संघटनेच्या वतीने या अधिवेशनात करण्यात येणार आहे.

अधिवेशनाच्या तयारीसाठी एक आयोजन समितीची बैठक संपन्न झाली या बैठकीला जयपूर महानगर टाइम्सचे संस्थापक तथा आमदार गोपाल शर्मा हे आवर्जून उपस्थित होते आणि त्यांनी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला.
हे अधिवेशन चांगल्या आणि उत्तम रीतीने पार पडावे यासाठी असोसिएशन ऑफ स्मॉल अँड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या संघटनेची राजस्थान शाखा संपूर्णपणे कार्यरत आहे. **

# खा.बजरंग सोनवणे यांचा रविवारी परळी तालुक्यात दौरा


बीड (बातमीदार):- बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे रविवारी परळी तालुक्यात विविध भेटी देणार आहेत.

बाभळगाव येथून भिलेगाव तालुका परळी, जिल्हा बीड कडे १०.४५ वा प्रयाण भिलेगाव येथे ११.२० वा मा सरपंच माणिकराव कडभाने यांचे निवासस्थानी सांत्वनपर भेट भिलेगाव येथून ११. ३५ वा कानडी ता परळी कडे प्रयाण कानडी येथे ११.४५ वा लहूदास कदम यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट कानडी येथून टाकळी आचार्य कडे १२.०० वा प्रयाण आचार्य टाकळी येथे १२.१५ वा अखंड हरिनाम सप्ताह निमित्त उपस्थिती आचार्य टाकळी येथून सिरसाळ्याकडे ०१.०० वा प्रयान सिरसाळा येथे सरपंच अन्वर पट्टेदार यांच्या निवासस्थानी ०१.१५ वा सदिच्छा भेट. अशी माहिती श्री सोनवणे यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली. **

# जिद्द आणि कष्टाच्या बळावर नेहा धोंडगे हिने मिळवली एम.बी.बी.एस.ची पदवी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- टेलरिंगचा व्यवसाय करणाऱ्या परळी वैजनाथ येथील श्री ज्ञानेश्वर धोंडगे यांच्या नेहा धोंडगे या मुलीने कष्ट आणि जिद्दीच्या बळावर वैद्यकिय शिक्षण घेत एम.बी.बी.एस.ची पदवी चांगल्या गुणांनी मिळवली आहे. तिच्या या मोठ्या यशाचे येथे कौतुक होत आहे.

कु.नेहा ज्ञानेश्वर धोंडगे परळी येथील थर्मल विभागातील नवीन प्राथमिक व न्यू हायस्कूल शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडली. तिला दहावीला ९४% गुण मिळाले. बारावीचे शिक्षण बार्शीच्या ज्ञानदीप महाविद्यालयातून तिने घेतले. वैद्यकिय शिक्षण घेण्याची तिची सुरुवातीपासूनची इच्छा होती. परंतु कुटुंबाची परिस्थिती सर्वसामान्य होती. वडील ज्ञानेश्वर धोंडगे मुलांचे शिक्षण व व्यवसायासाठी आवलगांव (ता.सोनपेठ) येथून परळी शहरात स्थायिक झाले होते. परळी शहरात टेलरिंगचा व्यवसाय करत असल्याने व कुटुंबाला दुसरे मोठे आर्थिक पाठबळ नसल्याने आपण हे शिक्षण पूर्ण



करु की नाही या विवंचनेत नेहा होती. परंतु मुलीची शिकण्याची तीव्र इच्छा व जिद्द पाहून वडील श्री ज्ञानेश्वर धोंडगे




यांनी मोठ्या कष्टाने मुलीच्या वैद्यकिय अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळऊन दिला. यासाठी रात्रंदिवस काम करण्याबरोबरच घरातील दागिने विकले. घर, सोनं सावकाराकडे ठेऊन पैशाची जोड लावली. वडील व कुटुंबाच्या कष्टाचे चिज करत नेहाने वैद्यकिय शिक्षणाचा अभ्यास जिद्दीने पूर्ण केला. सावर्डे, चिपळून (जिल्हा रत्नागिरी) येथील बी.के.एल.वालावलकर ग्रामीण वैद्यकिय महाविद्यालयातून नुकतीच एम.बी.बी.एस.या वैद्यकिय शिक्षणाची पदवी मिळवली आहे. महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या पदवीदान समारंभात महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.मानसिंगराव घाटगे यांच्यासह डॉ.पंकज कुलकर्णी, अरविंद यादव, डॉ.गजानन वेल्हाळ, अनघा मोडक, मृदूल भटजीवाले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ.नेहा धोंडगे हिस पदवी प्रदान करण्यात आली.

आपल्या वडीलांचे कष्ट, आईचे मार्गदर्शन, कुटुंबाची साथ यामुळेच आपण हे यश पूर्ण करू शकलो असे डॉ.नेहा धोंडगे हिने सांगितले. तर मुलीची शिक्षणाची जिद्द पाहून आपण कमी पडू नये म्हणून खूप मोठे कष्ट सोसत, सोनं विकून, घर-दार सावकाराकडे ठेऊन रात्रंदिवस काम करुन नेहाच्या शिक्षणाला पैसा पुरवला. आपण घेतलेल्या कष्टाचे तिने सोने असे वडील श्री ज्ञानेश्वर धोंडगे यांनी सांगितले. दरम्यान, श्री धोंडगे यांची दुसरी कन्याही मोठ्या बहिणीच्या पावलावर पाऊल टाकून वैद्यकिय शिक्षण घेत आहे. ***

**संपादकीय...**

# परळीकरांत तीव्र संताप.!

*** सुविचार ***

**जीवनात न पटणाऱ्या गोष्टी स्वत:ला स्पष्टपणे जो नाकारतो त्याला कधीच पश्चताप करण्याची वेळ येत नाही.**

ब्रम्ह, सरस्वती, वेणुमती (घनसी) या तीन नद्यांच्या सान्निध्यात वसलेले परळी शहर. परळी तालुक्याच्या सिमेवरून महागंगा गोदावरी वहात असली तरी 'गुप्तगंगेच्या काठावर परळी' असा उल्लेख धार्मिक ग्रंथात सापडतो. तर 'परळी पाण्यावर' अशी आख्यायिका येथे ऐकायला मिळते. एकेश आठ तीर्थे पुराणकाळी या नगरीत होती अशी माहिती आहे. या सर्व गोष्टीमुळे परळीत पाण्याचा ठणठणाट कधी गंभीर स्वरूपाचा झाला नसल्याचे लोक सांगतात. परंतु अलिकडच्या काळात परळीचा वाढता विस्तार व लोकसंख्या यामुळे परळीकरांना बऱ्याचदा पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. अनेकवेळा ही पाणी टंचाई प्रशासनाच्या गलथानपणामुळे परळीकरांच्या नशिबी येते, असे दिसते.

परळी शहराला या तालुक्यातील नागापूर येथील वाण गंगेवर बांधलेल्या 'वाण' मध्यम प्रकल्पातून पाणी पुरवठा होतो. १९७३-७४ सालापासून म्हणजे पन्नास वर्षापासून अखंडपणे वाण धरणातून परळी शहरास पाणी पुरवठा परळी पालिकेमार्फत केला जातो. सुमारे १९ दशलक्ष घनमीटर पाणी साठवण क्षमता असलेला 'वाण' मध्यम प्रकल्प परळी तालुक्यातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. पावसाळ्यात एकदा हा प्रकल्प भरल्यास सुमारे दोन वर्षे परळीकरांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध होते. या प्रकल्पातून परळीसाठी जेव्हा पाणी पुरवठा योजना सुरू झाली. तेव्हा परळी शहरास दररोज सकाळ-सायंकाळ नळाला पाणी येत असे. पुढे वाढती लोकसंख्या व पाण्याची वाढती मागणी यामुळे नळाला दररोज एक वेळा पाणी येऊ लागले. पुढे अनेक वर्षानंतर दिवसाआड पाणी पुरवठा सुरू झाला. नंतर तीन दिवसातून एकदा तर पुढे आठवड्यातून दोन वेळा आणि नंतरच्या काळात तर पाच दिवसाने, तर आत आठ दिवसांनी नळाला पाणी येऊ लागले. गेल्या कांही दिवसांपासून तर परळीत पाणी पुरवठ्याचे वेळापत्रकच राहिले नाही. कधीही, कितीही दिवसाने आणि कोणत्याही वेळी नळाला पाणी येते. पाणी पुरवठ्याबाबत परळी पालिकेच्या कारभारावर सर्वसामान्य परळीकर तीव्र नाराज तर आहेतच परंतु या गलथानपणाबाबत तीव्र संताप व्यक्त करताना दिसतात. गेली अनेक वर्षापासून हा गलथानपणा परळीकर अनुभवत आहेत.

गेल्या वर्षी पावसाळ्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे वाण प्रकल्प ओसंडून वहात होता. आजही या प्रकल्पात निम्याच्या आसपास पाणीसाठा आहे असे असतानाही परळीकरांना मात्र आठ-आठ, दहा-दहा दिवस पाणी पुरवले जात नाही. गेल्या काही महिन्यांपासून शहरात हा प्रकार सुरू आहे. शहरात नळाला आठ-दहा दिवस पाणीपुरवठा होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय सुरू आहे. त्यातल्या त्यातच शहरातील सार्वजनिक विंधन विहिरी, आड यांचा पाणीसाठा कमी झाला आहे. यामुळे गैरसोयीत भरच पडली आहे. वाण प्रकल्पात मुबलक पाणीसाठा असूनही परळीत नळाला दहा-दहा दिवस पाणीपुरवठा का केला जात नाही? असा सवाल सर्वसामान्य परळीकर व्यक्त करीत आहेत. याबाबत स्थानिक पुढारी, कार्यकर्ते का ओरड करत नाहीत असा प्रश्न परळीकरांना पडला आहे. पाणीपुरवठ्याबाबत परळी पालिकेचा ढिसाळ कारभार व अधिकाऱ्यांची निष्क्रीयता यामुळे सर्वसामान्य परळीकरही तीव्र असंतोष व्यक्त करत आहेत.

परळी शहराचा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा, पाणी पुरवठ्याचे वेळापत्रक पालिकेने निश्चित करून ते जाहीर करावे यासाठी लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याची गरज आहे. शिवाय प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही लक्ष द्यायला हवे, असे सर्वसामान्य परळीकरांना वाटते. ***

# सामाजिक शैक्षणिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले

***''निर्मिकाचा शोध,***
***मनुस्मृतीचा धिक्कार***
***ब्राह्मणांचे कसब । इशारा ।***
***अस्पृश्यांची कैफियत''***

परंपरागत जाती व्यवस्था, गुलामगिरी या विरूद्ध बंड करणारे, अस्पृश्यता निर्मूलन,स्त्री शिक्षण, शेतक-यांच्या प्रश्नाला वाचा फोडणारे शिवजयंतीचे जनक आणि समाजक्रांतीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुले म्हणजे बुद्धीनिष्ठ व विज्ञाननिष्ठ दृष्टीकोनातून आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण करणारे आद्य समाज क्रांतीकारक होय. स्त्रीशिक्षण व प्रौढ शिक्षणाचे जनक, बहुजनांच्या गौरवशाली संस्कृतीचे संकल्पक,विद्रोही परिवर्तनवादी साहित्याचे आद्यप्रवर्तक, पहिले आधुनिक नाटककार, आद्य अर्वाचीन कवी, दीनबंधू पत्राचे कर्ते, सार्वजनिक सत्यधर्माचे निर्माते, पहिले प्रयोगशील आधुनिक शेतकरी, कुशल बांधकाम व्यावसायिक असे अनेक पैलू महात्मा जोतीराव फुले यांच्या व्यक्तिमत्वात आहेत. महात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा परीचय करून देणारा लेखक रामकिसन मस्के यांचा लेख आपल्या महितीसाठी देत आहोत...!''

महात्मा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. इ.स.१८२७ ते इ.स.१८९० या काळात त्यांचे संपूर्ण आयुष्य भुमिपूत्रांच्या हक्कांसाठी, मनुवाद्यांच्या विरोधात लढण्यात गेले.इ.स.१८४० मध्ये जोतीराव व सावित्रीमाई हे विवाहबद्ध झाले.१ जानेवारी १८४८ रोजी जोतीरावांनी मुलींची पहिली शाळा पुण्यात सुरू झाली.अशा अनेक मुलींच्या आणि अस्पृष्य मुला-मुलींच्या शाळा महाराष्ट्रात सुरू केल्या. शाळांचा वाढता व्याप लक्षात घेता प्रशिक्षित शिक्षकांची मोठी अडचण दूर करण्यासाठी ट्रेंड शिक्षकांकरता फुले दांपत्याने एक नॉर्मल ट्रेनिंग स्कुल काढले.पालकांसाठी साक्षरता अभियान प्रकल्प उभारला.तत्कालिन वर्णवर्चस्वाच्या पायावर जाणीवपूर्वक उभारल्या गेलेल्या जातीव्यवस्थेने समाजात विषमता व अन्याय पसरवण्याचे षडयंत्र रचले गेले.अन्यायाच्या विरोधात १९ व्या शतकात क्रांतीसूर्य महात्मा फुले यांनी सत्यशोधक चळवळ उभी केली.त्याच चळवळीच्या विचारधारेतून सावित्रीमाई,फातेमाजी शेख,मुक्ताताई साळवे यांच्या सारखी विद्यार्थीनी,तारामती शिंदे,तानुबाई बिर्जे इत्यादी विद्रोही व लढावू बाण्यांच्या स्त्री शक्तिची फळी उदयास आली.हे फार मोठे यश महात्मा फुलेंच्या विचार व शिक्षणाचे होते.

**खरा शिक्षक,समाज शिक्षक :-** ''विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली, गती विना वित्त गेले वित्ताविना शुद्र खचले, हे सारे अनर्थ एका अविद्येने केले. १९ व्या शतकातील अज्ञानी समाजाला उन्नतीचा कानमंत्र दिला. गरीबांबद्दल तळमळ असल्यामुळे जोतीरावांनी त्यांना कर्मकांडापासून मुक्त होण्याचा मार्ग दाखविला.विधवा स्त्रियांचे पुनर्विवाह घडवून त्यांचे आयुष्य उभे केले.अनाथांचा सांभाळ करून नवजीवन दिले.मुलींना शिक्षणाचा अधिकार प्राप्त करुन दिला.प्रचलित समाज व्यवस्थेची बंधने झुगारून बहुजनांसाठी एका



वर्षात २० शाळा काढून ज्ञान मिळवून देण्याचा बहुमान महात्मा जोतीराव फुले यांना जातो.सार्वजनिक सत्यधर्म,सत्यशोधक समाजाची जोतीरावांनी स्थापना केली.संत तुकाराम महाराज व शिवराय यांना गुरू मानून अभंगासारखे खंड लिहिले. देव, धर्माच्या नावाखाली सामान्यांची होणारी लूट थांबण्यासाठी हा सामाजिक लढा उभा केला.लग्नासारखे अनेक कार्य 'भय' मुक्त केली.जोतीराव फुलेंच्या ''सार्वजनिक सत्यधर्म'' पुस्तक या लिखाणातील सत्य या सदरातील त्यांचे काही मुद्दे नव्या पिढीसमोर आणणे आवश्यक आहे.''सत्यशोधन'' ही एक जीवन रीत म्हणून स्विकारण्याचा दृष्टीकोन त्यामागे होता.एक सामाजिक आणि व्यक्तीगत आचरणाचे मूल्य म्हणून जोतीरावांनी वेळोवेळी सत्याची मांडणी केली आहे.

**''सत्य हाची धर्म । बाकी सर्व अधर्म ।।**

ज्या धर्मात स्त्री-पुरूष समान तत्व आचरणात आणले जाते. समता, स्वातंत्र्य, बंधुभाव इत्यादींना विशेष स्थान आहे.ज्या धर्मात उच्च-निच भेदभाव नाही तसेच अनेक कला गुण आणि कष्ट इत्यादींना प्राधान्य आहे. समाजातील कोणत्याही घटकांबद्दल कपट नीतिला कोणतेही स्थान नाही.भेदरहित,आदर्श,आधुनिक समाज रचनेस मान्यता आहे.मानवतेला सर्वोच्च स्थान आहे.अशा सत्याची मांडणी केली आहे. १९ फेब्रुवारी १८७० पासून जोतीरावांनी सर्वप्रथम पुण्यात शिवजयंती उत्साहाने साजरी केली.नंतर सर्वत्र सार्वजनिक शिवजयंती साजरी होवू लागली.सन १८६९ ला छत्रपती शिवजी महाराजांवर पोवाडा लिहून कुळवाडी भूषण ही सार्थ उपाधी फुले यांनी शिवरायांना लावली.शेतक-यांचा आसूड, गुलामगिरी,तृतीयरत्न नाटक, छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा, ब्राह्मणांचे कसब अशी अनेक नाटके, काव्य आजही मार्गदर्शक व प्रेरक ठरतात. त्याकाळी महाराष्ट्रात पेशवाई जावून इंग्रजांची सत्ता होती.सावकार,इंग्रजी सत्तेतील ब्राह्मण, कारकून यामध्ये शेतकरी भरडला जात होता.शेतक-यांना, दुर्बलांना, स्त्रियांना न्याय देण्यासाठी म.फुले यांनी मोठे जनआंदोलन उभे केले होते.जोतिबा-सावित्रीमाई यांचे सामाजिक कार्य हे सुरू होते. म्हणून त्यांच्या लोककार्याची दखल घेऊन समाजाने व इंग्रज सरकारने इ.स.१८८८ मध्ये जोतिबांना ''महात्मा'' ही पदवी दिली.हे सामाजिक जनआंदोलनाचा लढा लढताना त्यांना मोठे कष्ट उपसावे लागले. समाजातील तत्कालीन दुष्ट प्रवृत्तींचा त्रास सहन करावा लागला. वैयक्तिक निंदा, नालस्ती, बदनामीला सामोरे जावे लागले.तरी सुद्धा न डगमगता त्यांनी शैक्षणिक,सामाजिक क्रांती केली हा लढा आपणासाठी प्रेरणादायी आहे.२८ नोव्हेंबर १८९० ला महात्मा जोतीराव फुले यांचे दु:खद निधन झाले.

**समारोप :-** महात्मा जोतीराव फुले यांचे विचार हे मानव मुक्तीचे होते.आजही बहुजन समाजाला लढण्यासाठी त्यांच्या मार्गदर्शनाची नितांत गरज,आवश्यकता आहे.सावित्रीमाई फुले या शिक्षणाची प्रेरणा आहेत.२८ नोव्हेंबर हा महात्मा जोतीबा फुले यांचा स्मृतीदिन तो शिक्षक दिन,ज्ञान दिन म्हणून साजरा करावा अशी मागणी शासनाकडे मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड आणि समविचारी बहुजन विचार संघटनांनी केली आहे.लग्न आणि इतर सामाजिक,वैयक्तिक, घरगुती कार्य शिवधर्म,सत्यशोधक पद्धतीने होण्यासाठी तसेच ज्ञानवंत,मानवता युक्त संस्कार संपन्न समाज रचनेसाठी महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याला त्रिवार अभिवादन..!

***''संघर्ष आरपार आहे.***
***उठ मानवा जागा हो,***
***जुनी जळमट काढून,***
***परिवर्तनाचा धागा हो.''***
***जय जिजाऊ जयशिवराय ।***
***जय ज्योती जय भिमराय ।।***

**- रामकिसन गुंडिबा मस्के**
अंबाजोगाई

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशु प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**

# परळीतील सरस्वती नदीवर अतिक्रमण : ना.पंकजा मुंडे यांनी कानउघडणी केल्यानंतर नगरपरिषदने बजावल्या नोटीसा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील पुरातन नदी असलेल्या सरस्वती नदीवर अनाधिकृत प्रचंड अतिक्रमणे झालेले असुन या नदीपात्रात भराव टाकून व अनाधिकृत खोदकाम करून या नदीवरच चढाई करण्याचा प्रयत्न झाला होता. ही बाब पंकजा मुंडे यांनी गांभीर्याने घेत न.प. प्रशासनाची चांगलीच कानउघडणी केली होती. त्याच प्रमाणे स्वतः या घटनास्थळी जाऊन प्रचंड संताप व्यक्त केला होता. त्यानंतर आता न.प. प्रशासन खडबडून जागे झाले असुन आज २५ जणांना नगरपरिषदेने नोटीसा बजावल्या आहेत. नदीकाठावरील संबंधित सर्वच अतिक्रमण धारकांना नोटिसा बजावण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.नदीतील अतिक्रमणे स्वतःहून न काढल्यास नप प्रशासन करणार कायदेशीर कारवाई असल्याची मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी माहिती दिली.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी परळीतील सरस्वती नदीत होत असलेल्या अतिक्रमणाची गंभीर दखल घेत त्याची पाहणी केली होती.परळीच्या जुन्या गावातून वाहत असलेल्या सरस्वती नदीत अवैधरित्या भराव टाकण्याच्या



होत असलेल्या कामाबद्दल मंत्री मुंडे यांनी पालिका प्रशासनाला कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आता परळी नगरपालिका प्रशासनाने नदीपात्रात अतिक्रमण केलेल्या २५ नागरिकांना आज नोटीसा बजावल्या आहेत. सर्वांनाच नोटिसा काढण्यात आलेल्या असुन त्या दोन दिवसात बजावण्यात येणार आहेत. परळीच्या अंबेवेस भागातील सरस्वती नदीपात्रात अतिक्रमण होत असल्याचे दिसून आल्यावर आम्ही तिथे भेट दिली व ते काम थांबवले. आम्ही अतिक्रमणाच्या बाबतीत संबंधितांना नोटीसा बजावल्या आहेत. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी देखील या बाबतीत आम्हाला निर्देश दिले होते.पात्रात अतिक्रमण करणाऱ्यांना आम्ही कायदेशीर कारवाई करण्याच्या बाबतीत आज २५ नागरिकांना नोटीसा दिल्या आहेत. नदी पात्रात अतिक्रमण करणाऱ्यांनी स्वतः अतिक्रमण काढून घेण्याचे आवाहन परळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे यांनी केले आहे. अन्यथा त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही कांबळे म्हणाले आहेत. ***

## सावरकर ना.सह.पतसंस्थेला ७८ लाख ६६ हजार निव्वळ नफा-बाजीराव धर्माधिकारी



परळी वैजनाथ (बातमीदार):- शहरातील बँकींग क्षेत्रात ग्राहक सेवेत तत्पर व बँकीग व्यवहारात विश्वासार्ह पतसंस्था म्हणुन असलेली ओळख कायम ठेवत पतसंस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेचीवार्षिक वाटचाल मजबूत व प्रगतीपथावर आहे. सरत्या अर्थिक वर्षात संस्थेने १२३ कोटी ९५ लाख अर्थिक उलाढाल तर ७८ लाख ६६ हजार निव्वळ नफा कमावला आहे.ग्राहक व ठेवीदारांच्या विश्वासावरच ही वाटचाल सुरु असल्याचे चेअरमन बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले.

स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेची ३१ मार्च २२०२५अखेरचा ताळेबंद सादर करण्यात आला आहे. संस्थेची अर्थिकस्थिती पाहता संस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. विषेश म्हणजे अल्पावधीतच पतसंस्थेतील ठेवी-ठेवी ४१ कोटी ०५ लाख , राखीव निधी - ७ कोटी ४७ लाख, भागभांडवल-६७ लाख ४२ हजार , खेळते भांडवल-५० कोटी १५ लाख, कर्ज- ३६ कोटी ०६ लाख, गुंतवणूक १२ कोटी ५१ लाख, निव्वळ नफा ७८ लाख ६६ हजार इतका आहे.तर संस्थेची अर्थिक उलाढाल-१२३ कोटी ९५ लाख आहे.सीडी रेशो ६८.६२% इतका आहे.

पतसंस्थेच्या या प्रगतीशील वाटचालीत सर्व खातेदार, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा विश्वास हेच पाठबळ आहे असे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. पतसंस्थेचे उपाध्यक्ष अनिल आष्टेकर, सचिव जितेंद्र नव्हाडे , कोषाध्यक्ष रवि वळसे, संचालक श्रीकांत मांडे,राजाभाऊ मराठे, रवि मुळे, दशरथ होळकर, डॉ.सौ.श्रध्दा देशपांडे, सौ.पद्मश्री धर्माधिकारीयांच्यासह संस्थेचे व्यवस्थापक किरण सावजी यांच्यासह सर्व कर्मचारी वृंद, नित्यसंचय ठेव प्रतिनीधी यांच्या मेहनतीत व सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, खातेदार व हितचिंतकांच्या पाठबळावर संस्थेची ही वाटचाल सुरु आहे. ***

सा.परळी परिसर
वार्षिक वर्गणीदार व्हा..!
* अंकासाठी संपर्क *
मो.९४२२३२८४९३

